# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२४४/२०२२ मधील
# निशाणी क्र.१ वरील आदेश

CNR – **MHKO130014282022**

( पारीत दिनांक – ०७/०१/२०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार श्री. तुकाराम रामचंद्र कांबळे, रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी गैरअर्जदाराविरुध्द जन्म–मृत्यू नोंदणी नियम १९६९ कलम १३(३) प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदार यांची अशी विनंती आहे की, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कसबा सांगाव, ता. कागल, जि.कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे **आजोबा कै. लिंबाजी ओमाजी कांबळे यांच्या दिनांक २२/०१/१९८३** रोजीची मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घ्यावी.

२. प्रस्तुतच्या अर्जातील अर्जदाराचे कथन विचारात घेता या न्यायालयाच्या निष्कर्षासाठी खालील मुद्दे (Points) उपस्थित होत असून, त्याबद्दलचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे (Points) | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतो का की, अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचे आजोबा यांच्या मृत्यूची दिनांक २२/०१/१९८३ अशी नोंद ग्रामपंचायत कसबा सांगाव, ता.कागल येथील जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये करुन घेण्यास अर्जदार पात्र आहेत ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

३. अर्जदार यांनी याप्रकरणी निशाणी क्र. ७ कडे सरतपासाच्या शपथपत्राद्वारे स्वतःची साक्ष नोंदविलेली आहे. निशाणी क्र. १२ वर ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कसबा सांगाव, ता.कागल यांच्याकडील अर्जदार यांच्या आजोबाची मृत्यूच्या दिनांकाची

नोंदणी झाली नसल्याबाबत प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच निशाणी क्र. १० कडे ''पुण्यनगरी'' या वृत्तपत्रामध्ये दिनांक १८/११/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रगटनाची प्रत दाखल केली आहे व निशाणी क्र. ११ कडील पुरसिसनुसार पुरावा बंद केला आहे. तसेच अर्जदार यांचे आजोबा कै.लिंबाजी ओमाजी कांबळे यांचा मुलगा रामचंद्र लिंबाजी कांबळे यांचा मृत्यू दाखल्याची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. तसेच अर्जदार यांचे आजोबा कै.लिंबाजी ओमाजी कांबळे यांची इतर तीन मुले गणपती, आत्माराम व पोपट हे देखील मयत असून त्यांच्या मयत दाखल्याच्या झेरॉक्स प्रती हजर केल्या आहेत. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.पी.बी.लबाजे यांनी अर्जाप्रमाणे युक्तीवाद केला. त्यांनी युक्तीवादामध्ये अर्जातील कथनांचा पुर्नःउच्चार केला व शेवटी त्यांनी अर्जदाराचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**– <u>का र ण मि मां सा</u> –**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u> –**

४. याप्रकरणी अर्जदार यांनी निशाणी क्र. ७ या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राद्वारे स्वतःची साक्ष नोंदविलेली आहे आणि अर्जातील कथनाचा पुःर्नउच्चार अर्जदाराने सदर सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्रामध्ये केलेला आहे. अर्जदार याने निशाणी क्र. १० कडे ''पुण्यनगरी'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रगटनाची प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची तारीख २२/०१/१९८३ अशी नमूद आहे. सदर प्रकाशित केलेल्या बातमीस नमूद कालावधीत कोणाचीही हरकत आलेली नाही. तसेच निशाणी क्र. १२ कडील ग्रामपंचायत, कसबा सांगाव, ता.कागल यांचेकडील ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याचे अवलोकन करता, सदर दाखल्यामध्ये अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत अभिलेख सदरी नसल्याचे नमूद आहे. त्यामुळे एकंदरीत अर्जदाराचा पुरावा लक्षात घेता, अर्जदार मागणी करीत असलेली विनंती मंजूर होवून मिळण्यास पात्र आहेत, या अनुमानावर येवून मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष

नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत –**

५. मी यापूर्वीच मुद्दा क्र. १ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदविलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूच्या दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कसबा सांगाव, ता. कागल येथील जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये करुन घेण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**– आ दे श –**

१) अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार तुकाराम रामचंद्र कांबळे, रा. कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचे **आजोबा कै.लिंबाजी ओमाजी कांबळे यांच्या दिनांक २२/०१/१९८३** रोजी झालेल्या मृत्यूची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कसबा सांगाव, ता. कागल यांनी त्यांच्या कार्यालयाकडील जन्म–मृत्यू नोंदवहीचे दप्तरी नियमानुसार घ्यावी.

Digitally signed by BHASKAR DEVIDAS GORE
Date: 2023.01.07 18:06:07 +0530

कागल. **(बी. डी. गोरे)**
दिनांक – ०७/०१/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं. १, कागल.